# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)
अमरावती विभागीय कार्यालय
शेतकरी भवन, SBI- शाखेच्या वर दुसरा माळा, जुने कॉटन मार्केट, अमरावती-४४४६०१
दु. क्र. (०७२१) २५६७०६७, ई-मेल- amravati.ro@mswc.in


## हाताळणी कामाची निविदा सुचना

चिखली, जिल्हा बुलढाणा या वखार केंद्रावर अन्नधान्याचे हाताळणीचे काम करणेसाठी माथाडी व असंरक्षीत कामगार मंडळ यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदार / संस्थांकडून एक वर्ष कालावधीसाठी गोदामातील पोती हाताळणी कामाचे दरपत्रक मागविण्यात येत आहेत. या दरपत्रकामध्ये वखार केंद्रावर (ट्रकमधून पोती उतरवून गोदामात थप्पी लावणे व गोदामातील थप्पी तोडून पोती ट्रकमध्ये भरणे) यामध्ये माथाडी मंडळास लेव्ही चा समावेश करावा. नियमाप्रमाणे लेव्हीची रक्कम माथाडी मंडळाकडे भरण्याची जबाबदारी संबंधीत ठेकेदार / संस्थेची राहिल.

दरपत्रकासोबत 'अ' लिफाफ्यामध्ये ठेकेदाराची / संस्थेची माथाडी मंडळ नोंदणीकृत दाखल्याची प्रत, PAN कार्ड ची छायांकीत प्रत व सोबत अनामत रक्कम (EMD) रुपये ५०००/- महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे Union Bank of India चे बचत खाते क्र.438902010184693 IFSC Code- UBIN0543896 वर NEFT/RTGS/IMPS/UPI द्वारा जमा केलेल्या रकमेची पावती (payment receipt) जोडण्यात यावी आणि 'ब' लिफाफ्यामध्ये पोती हाताळणी कामाची दरपत्रक पाठवावीत. दोनही लिफाफे सिलबंद करून वरिल पत्त्यावर दिनांक १५/०२/२०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा बेताने पाठवावीत. 'अ' लिफाफ्यामधील जोडलेली सर्व कागदपत्र पात्र असल्यानंतरच 'ब' लिफाफा उघडण्यात येईल. कुठलेही कारण न दर्शविता आलेली सर्व दरपत्रक/दरपत्रके नाकारण्याचा हक्क महामंडळाने राखून ठेवलेला आहे. दरपत्रकांची कोरी निविदा वरिल पत्यावर विभागीय कार्यालय, अमरावती येथे उपलब्ध राहील. निविदाधारकास महामंडळाच्या सर्व अटी व शर्ती लागू राहतील. सदर दरपत्रके दिनांक १७/०२/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता विभागीय कार्यालय, म. रा. वखार महामंडळ, अमरावती येथे उघडण्यात येतील. त्यावेळी दरपत्रक सादरकर्त्यांना उपस्थित राहता येईल. महामंडळाकडून ठेका कालावधीत कामाची हमी देता येणार नाही.

(अ. द. मासाळ)
उप-महाव्यवस्थापक
अमरावती विभाग, अमरावती